जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 8 JAN 2017

पुढारी

# दिव्यांग व्यक्ती उत्तम जीवनाचे मूलमंत्र देणारे ऊर्जा केंद्र : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्ती समाजातील घटकांना उपलब्ध परिस्थितीमध्येही उत्तम जीवन जगण्यासाठी मूलमंत्र देणारे ऊर्जा केंद्र आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामध्ये दिव्यांग, विकलांग, अंध, अपंग, मूकबधिर व गतिमंद विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींकरिता आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सोनाली नवांगुळ उपस्थित होत्या.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले,



शिवाजीविद्यापीठातून

सर्वसामान्य व्यक्तीला स्वत:मध्ये आत्मविश्वास व इच्छाशक्ती निर्माण करण्यासाठी झगडावे लागते. परंतु, दिव्यांग व्यक्तींमध्ये फार मोठ्या प्रमाणात आत्मविश्वास असतो. त्यामुळे जनमानसांमध्ये दिव्यांग व्यक्तींबद्दल फार मोठे स्थान आहे. परिस्थितीवर नियंत्रण कसे ठेवावे, स्वाभिमानी आयुष्य कसे जगावे याचे हे उत्तम उदाहरण आहेत.

यावेळी 'शिक्षणातील संवेदना' या विषयावर बोलताना सोनाली नवांगुळ म्हणाल्या, दिव्यांग व्यक्तींनी बदलत्या परिस्थितीनुसार योग्य तो बदल अवगत करून सुदृढ व्यक्तींप्रमाणे जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी शिक्षण हाच उत्तम राजमार्ग आहे.

कार्यशाळेच्या दुपारच्या सत्रामध्ये पुणे येथील रमेश साठे, धनंजय भोले, नागपूर येथील राजेश आसुदानी तसेच इंग्रजी अधिविभागाचे सहायक प्राध्यापक मनोहर वासवाणी यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. सी. ए. लंगरे, डॉ. पी. बी. बिलावर उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी पाहुण्यांचा परिचय तर वरिष्ठ ग्रंथालय सहायक सुनील बिर्जे यांनी आभार मानले. यावेळी विविध महाविद्यालयांतील, शाळेतील, संस्थेतील, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर दिव्यांग/विकलांग कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ग्रंथालयविभागातीलकर्मचारीउपस्थित होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातील दिव्यांग विद्यार्थी इंद्रजित सरगर यास प्रदूषण विरहित इलेक्ट्रिक चार चाकी स्कूटर कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8 JAN 2017

पुण्यनगरी

# निरोगी, सक्षम पिढीसाठी निसर्गोपचाराची गरज : डॉ. सुमन बुवा

कोल्हापूर / प्रतिनिधी :

निरोगी आणि सक्षम पिढीसाठी निसर्गोपचाराची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. सुमन बुवा यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग आणि आयुर्वेदिक ॲक्युप्रेशर असोसिएशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विभागामध्ये आयोजित केलेल्या निसर्गोपचार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

डॉ. बुवा म्हणाल्या, आज निरोगी जीवनशैलीची अत्यंत आवश्यकता असून ती निसर्गोपचाराच्या माध्यमातून प्राप्त करणे शक्य आहे. पारंपरिक आजार दूर करण्याची क्षमता निसर्गोपचार पद्धतींमध्ये आहे. यामध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्य लाभते.

यावेळी डॉ. अरविंद फाळके यांनी, निसर्गोपचारामधील बारकावे विशद करून या उपचारकांनी आपले ज्ञान आधिकधिक विकसित करून सर्वसामान्यांपर्यंत ही निसर्गोपचार पद्धती पोहोचवावी, असे आवाहन केले. या शिबिरासाठी मुंबई, सातारा, सिंधुदुर्ग, सांगली, गोवा आदी ठिकाणांहून ४० निरनिराळ्या क्षेत्रातील उपचारक उपस्थित राहिले आहेत. हे निवासी शिबिर दि. ६ ते ८ जानेवारी या कालावधीमध्ये सुरू राहणार असून, त्यामध्ये वनौषधी, नैसर्गिक आहार, ॲक्युप्रेशर, मसाज, योगा या विषयांवर डॉ. सारंग पाटील, डॉ. सुशील पाटील, डॉ. स्मिता अनगळ, डॉ. चंद्रशेखर मोडक, डॉ. टिकेकर आदींचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच चर्चा आणि प्रत्यक्ष सराव करून घेणार आहेत. डॉ. नामदेव पाटील यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. मोडक यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. यशोधन बोकील यांनी केले. यावेळी शांतिनाथ पाटील, भानुदास पाटील, प्रकाश फाळके, डॉ. विद्यालक्ष्मी राजहंस, उदय यादव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 8 JAN 2017

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात 'ग्रीन' कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाच्या वाहन ताफ्यात आज पर्यावरणपूरक वाहन (ग्रीन कार) दाखल झाले. शनिवारी 'नो व्हेईकल डे'चे औचित्य साधून कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या ग्रीन कार सुरक्षा विभागास प्रदान केली.

शिवाजी विद्यापीठाच्या ८५० एकर परिसरात सुरक्षा विभागाकडून दिवस-रात्र ठरावीक वेळेत गस्त (पेट्रोलिंग) घालण्यात येते. त्यासाठी पूर्वी एकच वाहन विभागाकडे होते. त्यामुळे इंधनावरील खर्च मोठा होता. अलीकडेच या ताफ्यात एक मोटारसायकल दाखल झाली. त्यामुळे हा खर्च कमी झाला. पर्यावरणपूरक वाहन दाखल झाल्यामुळे हा खर्च आणखी कमी होणार आहे.

उद्घाटनानंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, सुरक्षा अधिकारी वसंत एकले यांच्यासह विद्यार्थिनींनी या ग्रीन कारमधून कॅम्पसमध्ये फेरफटका मारला.

## अशी आहे गाडी...

या वाहनाची एकूण आसनक्षमता आठ असून, कॅम्पसमध्ये पेट्रोलिंगसाठी अत्यंत उपयुक्त आहे. पाच बॅटरीवर हे वाहन चालते. या बॅटरी सहा तासांत पूर्ण चार्ज होतात, त्यावर साठ किलोमीटर इतके अंतर पार करता येते. यासाठी केवळ ५० रुपये प्रतिदिन खर्च येणार आहे.



हे वाहन वायू तसेच ध्वनीप्रदूषणमुक्त आहे. याचा देखभाल खर्चही जवळजवळ शून्य आहे. या वाहनाला आरटीओ परवाना अथवा चालक परवान्याचीही आवश्यकता नाही. असे बहुमोल वाहन सुरक्षा ताफ्यात दाखल झाल्यामुळे विद्यापीठाचा इंधनावरील खर्च बराच कमी होणार आहे.

- कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे